# कृषि निविष्ठा विक्री व्यवस्थापन कक्ष

**दुरदृष्टी (Vision) :**

- ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांना कृषी निविष्ठा उदा. खते, किटकनाशके व बियाणे यांचा पुरवठा करणे
- कृषी निविष्ठा वेळेवर आणि योग्यदरात पुरवठा करणे

**ध्येय (Mission) :**

- केंद्र शासनाचे "पंतप्रधान किसान समृध्दी केंद्र" योजनेची राज्यात अंमलबजावणी करणे.
- राज्यात 12,000 वि.का.स. संस्थामध्ये "पंतप्रधान किसान समृध्दी केंद्र" कार्यान्वीत करणे.
- जमिनीचा पोत सुधारणे, खतांच्या खर्चात बचत करणे, खतांची कार्यक्षमता वाढवणे व वेळेची बचत होण्याच्या दृष्टीने ड्रोनव्दारे विद्राव्य खतांचे फवारणी बाबत (नॅनो युरिया व नॅनो डीएपी) प्रचार व प्रसिध्दी करणे.
- शेतक-यांना माती परिक्षणानुसार, खतांच्या वापराबाबत प्रचार, प्रसिध्दी आणि मार्गदर्शन करणे.

**सेवा (Service) :**

- राज्यातील विविध कार्यकारी सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांना खते, किटकनाशक, बियाणे यांच्या विक्रीचा "वितरक परवाना" काढण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य करणे.
- राज्यातील विविध कार्यकारी सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांना विविध खत कंपन्यांकडून योग्य वेळी व योग्य दरात खतांचा पुरवठा करणे.

**उपलब्धी (Achievements)**

- महामंडळास खत उत्पादक कंपन्या उदा. RCF, IFFCO, KRIBHCO, COROMANDAL, Deepak Fertilizer, Aarti Fertizer यांचे "राज्य वितरक" म्हणून मान्यता प्राप्त.
- महामंडळामार्फत 650 वि.का.स. संस्था व शे.उ.कं. यांचा स्वत:चा खताचा व्यवासाय कार्यान्वीत

राज्यातील शेतकरी वर्गाला शेतीचा व्यवसाय करत असताना सातत्याने खतांची आवश्यकता भासत असते. शेतक-यांना खरेदी विक्री सहकारी संघ व विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) संस्था यांचेमार्फत पूर्वी खताचा पुरवठा करण्यात येत होता. मात्र,राज्यातील बहुतांश खरेदी विक्री सहकारी संघ अडचणीत आल्यामुळे त्यांचे मार्फत खत पुरवठा करण्याचे प्रमाण नगण्य झाले. तसेच, विविध कार्यकारी सहकारी संस्था या देखील विविध कारणांमुळे अडचणीत आल्या, व त्यामुळे शेतक-यांना खत उपलब्ध होण्यास अडचणी येऊ लागल्या. राज्यात अलीकडच्या कालावधीत मोठया प्रमाणावर शेतकरी उत्पादक कंपनी (शे.उ.कं.) यांची नोंदणी झाली आहे. मात्र, एकूण कार्यरत असणा-या शेतकरी उत्पादक कंपन्यापैकी अल्पप्रमाणात कंपन्या आर्थिकदृष्टया सक्षम आहेत. तसेच, राज्यामधील आर्थिकदृष्टया सक्षम असलेल्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे प्रमाण देखील अल्प आहेत. यास्तव, वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना महामंडळाने कृषी निविष्ठा विभागा मार्फत विविध कृषी निविष्ठा उदा. खते, कीटकनाशके, बियाणे इ. बाबतचा पुरवठा करणेबाबत धोरण स्वीकारले आहे. याअनुषंगाने, राज्यातील विविध

कार्यकारी सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांचे सभासद शेतकरी यांना नियमित खत पुरवठा करण्याच्या अनुषंगाने महामंडळाने माहे जून 2020 पासून कृषी निविष्ठा विभाग कार्यान्वीत केला आहे.

महामंडळाने, RCF, IFFCO, KRIBHCO, Cormandal, Deepak Fertilizer, Aarti Fertilizer या प्रमुख खत उत्पादन करण्या-या कंपन्यांचा "राज्यस्तरीय घाऊक विक्रेता" (State Distributer) परवाना घेतलेला आहे. खताचा व्यवसाय महामंडळाने रोख स्वरूपात (Cash and carry) करणे, तसेच, राज्यातील वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांचेसाठी खताचा व्यवसाय करावा असे धोरण स्विकारलेले आहे. कृषि निविष्ठा विभागांतर्गत, राज्यातील विविध विभागामध्ये विभागीय व्यवस्थापकांची नेमणूक करण्यांत आलेली आहे. विभागीय व्यवस्थापक यांचे मार्फत त्यांच्या विभागातील प्रत्येक जिल्हयामधील वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना महामंडळातील सदर व्यवसायाच्या माहितीचा प्रसार करण्यात येतो.

विभागीय व्यवस्थापक यांचे मार्फत संबंधीत खत पुरवठा करणा-या कंपनीच्या जिल्हानिहाय रॅक उपलब्धीची माहिती वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना कळविली जाते. त्यानुसार, वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांचे मार्फत खताची मागणी संकलीत करून एकुण मागणी व त्याची किंमत महामंडळाकडे पाठविण्यांत येते. तद्नंतर, महामंडळाकडून एकत्रीत खताची मागणी व त्यासाठीची देय रक्कम संबंधीत खत पुरवठादार कंपनीस पाठविण्यांत येते. महामंडळाची एकत्रित खताची मागणी रेल्वे रॅकच्या माध्यमातून संबंधीत खत पुरवठादार कंपनीमार्फत वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना पुरवठा करण्यांत येतो. वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना खताचा पुरवठा करत असताना खताच्या विक्रीयोग्य किंमतीमध्ये या संस्थांना नफा मिळेल असे धोरण महामंडळाने स्वीकारले आहे. यामुळे वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना त्यांचे कामकाजामध्ये उत्पन्नाचा एक स्त्रोत निर्माण होण्यास मदत होते.

महामंडळामार्फत विविध खत पुरवठादार कंपन्यांकडून विविध प्रकारच्या खताचा पुरवठा करण्यांत येतो, उदा. युरिया, डी.ए.पी., कॉप्लेक्स, 10:26:26, 12:32:16, 20: 20:0:13, सुफला, 15: 15: 15, सर्व प्रकारचे सुफर फॉस्फेट ग्रेड इ. तसेच, सर्व प्रकारची पाण्यात विरघळणारी खते उदा. नॅनो युरिया, नॅनो डीएपी, 12:61:0, 19:19:19, 0:52:34, 0:0:50 इ. तसेच, जमिनीचा पोत सुधारण्यासाठी सिटी कंपोस्ट.

वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांना त्यांचेकडील असलेले शेतकरी सभासदांसाठी खताचा व्यवसाय करावयाचा असल्यास, अशा संस्थांना खत पुरवठा करण्याचा परवाना घेणे बंधनकारक असून असा परवाना घेण्याबाबत महामंडळ संबंधित संस्थेस मागदर्शन व सहकार्य करते. तसेच, असा व्यवसाय करण्यासाठी संस्थांना आवश्यक असणारा Mobile Fertilizer Monitoring System (MFMS) क्रमांक (ID) कार्यान्वीत करण्याबाबत देखील मागदर्शन व सहकार्य करते.

महामंडळातील कृषी निविष्ठा विभागामार्फत सन 2021-22 व 2022-23 मध्ये अनुक्रमे सुमारे रू. 37 कोटी व 31 कोटी खत विक्रीचा व्यवसाय करण्यांत आला आहे.

राज्यातील विविध वि.का.स.संस्था व शे.उ.कं. यांनी महामंडळासोबत खताचा व्यवसाय करावा, असे अवहान करण्यात येते, जेणेकरून या संस्थांना त्यांचे सभासद शेतक-यांना नियमितपणे रास्त भावात खताची उपलब्धता करून देणे शक्य होईल.